अस्थायी पदांना मुदतवाढ : दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.अस्थायी-२७२६/प्र.क्र.२०/१-स**
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०२ एप्रिल, २०२६.

संदर्भ:-

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, क्र.राजस-१००८/प्र.क्र.५३८/५-स, दि.०५.०५.२०११.
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, क्र. प्रक्रिया-०७२५/प्र.क्र.७१/१-स, दि.०३.१०.२०२५.
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.जा.क्र. आस्था/कक्ष-१/कृषी प्रक्रिया /२०२६/३३७, दि.२३.०२.२०२६.
४) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या अधिनस्त असलेल्या कृषी प्रक्रिया सहकारी संस्था या योजनेतील ३१ अस्थायी पदांना विभागास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

सदर अस्थायी पदांना दिलेली मुदत संपुष्टात आल्यामुळे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये, सदर योजनेतील ३१ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. यास्तव सदर अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या अधिनस्त असलेल्या कृषी प्रक्रिया सहकारी संस्थाच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या ३१ अस्थायी पदांना **दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६** या कालावधीसाठी खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

२.	**सदरची मुदतवाढ खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-**

१) सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेल्या अस्थायी पदांना ही मुदतवाढ लागू असणार नाही.

२) अस्थायी पदे ज्या कारणास्तव मंजूर केली आहेत. त्यांचे पालन करण्यात यावे.

३) वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सुधारित आकृतीबंध अंतिम करून घेण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

४) सुधारित आकृतीबंधाची/पदांच्या आढाव्याची कार्यवाही मुदतीत पूर्ण न झाल्यास सदर अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्याचा प्रश्न निर्माण झाल्यास ती संबंधित कार्यालयाची जबाबदारी राहील.

५) राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेअंतर्गत कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना देण्यात आलेल्या अर्थसहाय्याच्या वसुलीच्या अनुषंगाने प्राथम्याने कार्यवाही करण्यात यावी.

३.	**कृषी प्रक्रिया सहकारी संस्थाच्या लेखापरिक्षणासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे, यांच्या अधिनस्त असलेल्या ३१ अस्थायी पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

**अस्थायी पदांचा तपशील**

| अ. क्र. | पदनाम | जिल्हा | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ठाणे | रायगड | नाशिक | धुळे | सांगली | बीड | नागपूर | भंडारा | |
| १ | विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ४ |
| २ | लेखापरिक्षक श्रेणी-१ | १ | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ३ |
| ३ | लेखापरिक्षक श्रेणी-२ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| ४ | उपलेखापरिक्षक | १ | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ४ |
| ५ | कनिष्ठ लिपिक | ३ | २ | १ | २ | १ | १ | १ | १ | १२ |
| ६ | शिपाई | २ | ० | १ | १ | ० | १ | ० | १ | ६ |
| | **एकूण पदे** | **८** | **४** | **३** | **५** | **२** | **३** | **३** | **३** | **३१** |

४.	सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२८.०२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०४०२१०५१०९४६०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ASMITA RAVINDRA PATIL
Date: 2026.04.02 10:52:38 +05'30'

**(अस्मिता पाटील)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
६) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरिक्षण).
७) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था : ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, सांगली, बीड, नागपूर, भंडारा, पुणे.
८) जिल्हा कोषागार अधिकारी : ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, सांगली, बीड, नागपूर, भंडारा, पुणे.
९) वित्त विभाग (व्यय-२/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.
१०) उप सचिव, (५-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई.
११) निवडनस्ती (१-स).